# University of Pune,
# Pune- 411007
# Board of College and University Development

जा. क्र. ओ.एस.डी/बी.सी.यु.डी/२६६ दिनांक:—२५/०६/२०१२

प्रति,
मा. प्राचार्य /मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये
व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.

विषय : संशोधन प्रकल्प योजना (Research Project Scheme)

महोदय,

पुणे विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयामध्ये व मान्यता प्राप्त संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २००६—२००७, २००७—२००८, २००९—२०१० व २०११—२०१२ मध्ये अनुदान प्राप्त संशोधन प्रकल्पांपैकी अपूर्ण व लेखे (Audit) सादर न केलेले संशोधन प्रकल्प यासाठी आपल्या महाविद्यालय/संस्थेतील खालील प्राध्यापकांनी हिशोब सादर न केल्याने त्यांच्यासाठी केंद्रिय पध्दतीने लेखे स्विकारण्यासाठी जिल्हानिहाय शिबीर बोलविण्यात येत आहे.

तरी संलग्न महाविद्यालयातील शैक्षणिक व संशोधन समन्वयक यांनी दिलेल्या तारखांप्रमाणे उपस्थित रहावे.

| अ. क्र. | जिल्हा | ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर व नाशिक | ओ.एस.डी/बी.सी.यु.डी. ऑफिस, पुणे विद्यापीठ, पुणे. | १६/०७/२०१२ | स. १०.०० ते दु. ५.०० |
| २. | पुणे शहर | | १७/०७/२०१२ | |
| ३. | पुणे ग्रामिण व पुणे शहर | | १८/०७/२०१२ | |

शिबीरास येताना सोबत सन २००७, २००८, २००९, २०११ हया कालावधीतील प्रकल्प मान्यता पत्र, प्रत्यक्षात अनुदान मिळाल्याचा चेक नंबर व रक्कम रूपये, वर्षातील अंदाज खर्चाचे मान्यताप्राप्त प्रमाणपत्र (Revised Budget), लेखा प्रमाणपत्र (Audit Statement), मुळ देयके, Innovation चे प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे. एकूण हिशोब सनदी लेखापाल (Chartered Accountant) यांच्याकडून तपासून लेखा प्रमाणपत्रासह सादर करावा. उपकरणे, साधने यांची Stock entry, पुस्तकांच्या ग्रंथालयातील नोंदीचा पुरावा व सर्व कागदपत्रांवर मा. प्राचार्यांची सही सादर करणे आवश्यक आहे.

तसेच सन २००६—२००७, २००७—२००८ व २००९—२०१० मध्ये अनुदान प्राप्त संशोधक प्राध्यापकांनी त्यांचा संशोधन प्रकल्प (Research Project) जमा करणे अपेक्षित आहे.

तसेच वर नमूद केलेल्या संशोधक प्राध्यापकांनी सदर आयोजित केलेल्या केंद्रिय हिशोब शिबीरात संशोधन प्रकल्पांचे हिशोब व अहवाल सादर न केल्यास, आपल्या महाविद्यालयातील संशोधन प्राध्यापकांचे अपूर्ण राहिलेले संशोधन प्रकल्प जमा होत नाहीत. तोपर्यंत भविष्यात संबंधित महाविद्यालय/संस्था संशोधन प्रकल्प मिळण्यास पात्र राहणार नाही.

कळावे,

डॉ. रविंद्र जायभाये
विशेष कार्याधिकारी, म.वि.वि.मं.